

मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडमध्ये अनधिकृत बांधकामांना दणका!

## घरखरेदी-विक्रीचे व्यवहार अडकणार; वीज, पाणी, ड्रेनेज जोडण्यावरही निर्बंध!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांना आळा घालण्यासाठी राज्य शासन आणि महापालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अनधिकृत बांधकामांमधील सदनिका, गाळे आणि मिळकतींच्या खरेदी-विक्री व्यवहारांची दस्तनोंदणी रोखण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, अशा बांधकामांना वीज, पाणी आणि ड्रेनेज जोडणी देण्यावरही निर्बंध आणले जाणार आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकाम करणारे बांधकाम व्यावसायिक आणि मिळकतधारकांचे धाबे दणाणले आहेत.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अनधिकृत बांधकामांना आळा घालण्याचे निर्देश दिले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे शहरातील एकूण ७ लाख ९२ हजार ३९९ मिळकतींची नोंद असून, त्यापैकी तब्बल १ लाख ४२ हजार ६५३ बांधकामे अनधिकृत आहेत. यामध्ये १ लाख २३ हजार ४१ निवासी, १० हजार ४७६ बिगरनिवासी आणि १ हजार ८३६ औद्योगिक बांधकामांचा समावेश आहे.

शहरातील रेड झोन, बफर झोन, हरित क्षेत्र, नदीच्या निळ्या व लाल पूररेषा, आरक्षित जागा आणि नैसर्गिक नाल्यांच्या परिसरात अनधिकृत बांधकामांचे पेव फुटले आहे. राज्य शासनाने २०२२ पर्यंतच्या बांधकामांच्या नियमितीकरणासाठी धोरण आखले असले, तरी त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे आता संबंधित सर्व्हे क्रमांकांची माहिती मुद्रांक व नोंदणी विभागाला देऊन अनधिकृत बांधकामांशी संबंधित खरेदी-विक्री व्यवहारांची दस्तनोंदणी रोखण्यात येणार आहे. अनधिकृत बांधकामांना पाणीपुरवठा, ड्रेनेज आणि वीजजोडणी मिळू नये, यासाठी महापालिका संबंधित विभागांना पत्र देणार आहे.

अनधिकृतपणे अथवा चोरून नळजोड आणि ड्रेनेज जोडणी घेतल्यास संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. वीजजोडणी रोखण्यासाठी महावितरणलाही कळविण्यात येणार आहे. महापालिकेच्या नोंदीत १.४२ लाख अनधिकृत बांधकामे असली, तरी शहरातील प्रत्यक्ष संख्या तीन लाखांपेक्षा अधिक असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. अनधिकृत पत्राशेड, आरक्षित जागांवरील बांधकामे आणि प्रतिबंधित क्षेत्रांतील मिळकतींचाही यात समावेश आहे. अशा बांधकामांकडे महापालिकेचे बीट निरीक्षक दुर्लक्ष करीत असल्याचे आरोप यापूर्वी अनेकदा झाले आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### अनधिकृत बांधकामांना अभय कुणाचे?

पिंपरी-चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामांचा आकडा तीन लाखांच्या घरात पोहोचल्याचा अंदाज व्यक्त होत असताना महापालिका प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. रेड झोन, पूररेषा, आरक्षित जागा आणि नैसर्गिक नाल्यांवर बिनधास्त बांधकामे उभी राहत असताना महापालिकेची यंत्रणा नेमकी काय करीत होती, असा सवाल उपस्थित होत आहे. अनधिकृत बांधकामांना वेळीच आळा घालण्यात अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार का? केवळ सर्वसामान्य नागरिकांवर निर्बंध लादण्याऐवजी अनधिकृत बांधकामांना पाठबळ देणाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे.

> “शहरात अनेक व्यावसायिकांच्या वतीने अनधिकृत इमारती उभारल्या जातात. बांधकामे केली जातात. त्यामुळे सर्वसामान्य माणसांची आर्थिक फसवणूक होते. यापुढे अनधिकृत बांधकामे होऊ दिली जाणार नाही. त्यावर नियंत्रण आणले जाईल. यासाठी निर्देश दिले आहेत. तसेच, तीन महिन्यांनी बीट निरीक्षकांची बदली केली जाणार आहे. मुद्रांक व नोंदणी विभागास सर्व्हे क्रमांक दिल्याने त्या भागांतील अनधिकृत बांधकामांची नोंद केली जाणार आहे. महापालिकेकडून नळजोड, ड्रेनेजलाईन जोड दिला जाणार नाही. महावितरणनेही वीज जोड देऊ नये, यासाठी त्यांना पत्र दिले जाणार आहे.”
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी,
> **आयुक्त महापालिका**

# नवी सांगवीत सिमेंटचा रस्ता पुन्हा खोदणार; ४० फूट खोल ड्रेनेज चेंबर ढासळले

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या नियोजनशून्य कारभाराचा आणखी एक नमुना नवी सांगवीत समोर आला आहे. लाखो रुपये खर्चून तयार केलेला सिमेंट काँक्रीटचा रस्ता आता ड्रेनेज चेंबरच्या दुरुस्तीसाठी पुन्हा खोदण्याची वेळ प्रशासनावर आली आहे. प्रभाग क्रमांक ३२ मधील पेरूची बाग परिसरात सुमारे ४० फूट खोल असलेले ड्रेनेज चेंबर ढासळल्याने प्रभाग क्रमांक २९ कडून येणारी ड्रेनेज लाईन पूर्णपणे चोकअप झाली आहे. त्यामुळे सांडपाण्याचा प्रवाह ठप्प झाला असून, दुरुस्तीसाठी तब्बल १२ मीटर रुंदीचा सिमेंट काँक्रीटचा रस्ता खोदावा लागणार आहे.**



पिंपळे गुरव येथून नवी सांगवीतील पेरूची बाग मार्गे जुनी सांगवीपर्यंत जाणारी ही ड्रेनेज लाईन सुमारे ३० वर्षांपूर्वी टाकण्यात आली होती. जमिनीपासून जवळपास ४० फूट खोल असलेल्या या वाहिनीची देखभाल आणि दुरुस्ती करणे आव्हानात्मक आहे. दरम्यान, या मार्गावरील ड्रेनेज चेंबर ढासळल्याने त्याचा मलबा वाहिनीमध्ये साचला आहे. त्यामुळे सांडपाण्याचा प्रवाह पूर्णपणे अडथळला असून, या वाहिनीशी जोडलेल्या पिंपळे गुरव परिसरातील ड्रेनेज व्यवस्थेवरही परिणाम झाला आहे.

विशेष म्हणजे, या परिसरातील रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात आले आहे. मात्र, रस्ता तयार करण्यापूर्वी त्याखालील जुन्या ड्रेनेज वाहिन्या आणि चेंबरची स्थिती तपासण्यात आली होती का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. कोट्यवधींची विकासकामे करणाऱ्या महापालिकेच्या विविध विभागांमध्ये समन्वय नसल्याचे या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# आखाड्यातील सवंगडी भेटले अन् महेश लांडगे भावुक झाले!

## गुलशे तालमीतील पैलवान आणि वस्तादांच्या भेटीने जुन्या आठवणींना उजाळा

» पिंपरी | प्रतिनिधी

**राजकारणाच्या आखाड्यात आपला ठसा उमटवणारे आमदार महेश लांडगे नवरात्रोत्सवाच्या चौथ्या माळेला कुस्तीच्या आखाड्यातील जुन्या सवंगड्यांच्या भेटीने भावुक झाले. पुण्यातील गुलशे तालमीत कुस्तीचे धडे गिरवताना सोबत असलेले पैलवान मित्र, मार्गदर्शक वस्ताद आणि ज्येष्ठ मल्ल महाआरतीनिमित्त एकत्र आले. त्यामुळे कुस्तीच्या मातीत घडलेल्या संघर्षमय प्रवासाच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या.**



पै. महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही आयोजित करण्यात आलेल्या भव्य नवरात्रोत्सवाच्या चौथ्या माळेनिमित्त आई अंबाबाईची महाआरती अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. देवीच्या आराधनेने भारावलेल्या या सोहळ्याला यंदा विशेष भावनिक किनार लाभली. शहरातील ज्येष्ठ मल्ल, अनुभवी वस्ताद, कुस्ती क्षेत्रातील मार्गदर्शक आणि पुण्यातील प्रसिद्ध गुलशे तालमीतील पैलवान सवंगड्यांनी या महाआरतीला आवर्जून उपस्थिती लावली. सर्वांनी एकत्रितपणे आई अंबाबाईचे दर्शन घेत देवीचरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले. कुस्तीच्या आखाड्यात शक्तीची उपासना करणारे पैलवान आणि देवीच्या चरणी लीन झालेले भाविक यांच्या उपस्थितीमुळे या सोहळ्यात भक्ती आणि शक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला.

आमदार महेश लांडगे यांची जडणघडण कुस्तीच्या आखाड्यात झाली आहे. कुस्ती हा त्यांच्या आयुष्यातील केवळ एक खेळ नसून, त्यांचे व्यक्तिमत्त्वाला आकार देणारी संस्कारांची शिदोरी आहे. पुण्यातील गुलशे तालमीत त्यांनी कुस्तीचे प्राथमिक धडे गिरवले. आखाड्यातील मातीशी नाते जोडले, कठोर परिश्रमाची सवय अंगीकारली आणि वस्तादांच्या मार्गदर्शनाखाली शिस्त, संयम, जिद्द, चिकाटी आणि संघर्षाचे धडे आत्मसात केले. पहाटेपासून सुरू होणारा सराव, आखाड्यातील मेहनत, कुस्तीतील डावपेच शिकण्यासाठी केलेले प्रयत्न आणि सोबतच्या पैलवान मित्रांबरोबर घालवलेले दिवस त्यांच्या जडणघडणीचा अविभाज्य भाग राहिले आहेत. त्याच काळात निर्माण झालेली मैत्री, वस्तादांबद्दलचा आदर आणि तालमीच्या मातीशी जुळलेली भावनिक नाळ आजही कायम असल्याचे या भेटीतून दिसून आले.

कुस्तीच्या आखाड्यातून सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर आमदार लांडगे यांनी राजकारणात आपले वेगळे स्थान निर्माण केले. लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदाऱ्या वाढल्या, कार्यक्षेत्र विस्तारले आणि सार्वजनिक जीवनातील व्यस्तताही वाढली. मात्र, या संपूर्ण प्रवासात त्यांनी आपल्या कुस्तीच्या मातीशी असलेले नाते कधीही तुटू दिले नाही. ज्या वस्तादांनी त्यांना कुस्तीचे धडे दिले, ज्या सवंगड्यांसोबत त्यांनी आखाड्यात घाम गाळला आणि ज्यांच्या सहवासात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली, त्या सर्वांप्रती असलेली आपुलकी आजही कायम आहे.

### राजकारणात रमले, पण कुस्तीची माती विसरले नाहीत!

आमदार महेश लांडगे यांनी राजकारणात आपले वेगळे स्थान निर्माण केले असले, तरी कुस्तीच्या आखाड्याशी असलेली नाळ आजही तितकीच घट्ट आहे. पुण्यातील गुलशे तालमीत घाम गाळत घडलेला पैलवान आज लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत आहे. मात्र, वस्तादांप्रतीचा आदर आणि जुन्या सवंगड्यांबद्दलचा जिव्हाळा कायम आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने पैलवान मित्रांची भेट होताच जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. पद मोठे झाले, जबाबदाऱ्या वाढल्या; पण मातीशी असलेले नाते आणि पैलवानकीचे संस्कार कायम राहिले, हाच संदेश या भावनिक भेटीतून अधोरेखित झाला.

> “पैलवान हा भक्ती आणि शक्तीची उपासना करणारा साधक असतो. तालमीच्या मातीने मला ताकद दिली, वस्तादांनी शिस्त शिकवली आणि सवंगड्यांनी आयुष्यभराची साथ दिली. आज आई अंबाबाईच्या आरतीनिमित्त ही जिवाभावाची माणसं भेटली आणि कुस्तीच्या आखाड्यातील आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. आयुष्यात जबाबदाऱ्या कितीही वाढल्या, तरी मला घडवणाऱ्या मातीशी आणि कुस्तीच्या परिवाराशी असलेली नाळ कायम जपणार आहे.”
>
> – महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# मोशीत पत्नीचा निर्घृण खून; पतीसह चौघांच्या २४ तासांत मुसक्या आवळल्या!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने तीन साथीदारांच्या मदतीने तिचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना मोशी येथे उघडकीस आली आहे. धारदार शस्त्राने वार करून महिलेचा चेहरा विद्रूप करण्यात आला होता. या खळबळजनक गुन्ह्याचा अवघ्या २४ तासांत छडा लावत एमआयडीसी भोसरी पोलिसांनी पतीसह चार आरोपींना अटक केली आहे.**



मोशीतील बोऱ्हाडेवाडी परिसरातील मंत्रा मोमेंट्स सोसायटीच्या कमर्शियल ऑफिससमोर १२ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास एका ३० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. संबंधित महिलेवर धारदार शस्त्राने वार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. तसेच, महिलेचा चेहरा विद्रूप करण्यात आल्यामुळे मृतदेहाची ओळख पटविणे पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन एमआयडीसी भोसरी पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. मृत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी विविध पातळ्यांवर तपास सुरू केला. गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती, तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी तपासाला योग्य दिशा दिली. या तपासातून मृत महिलेची ओळख प्रियंका आकाश कांबळे अशी पटविण्यात पोलिसांना यश आले. ओळख निश्चित झाल्यानंतर पोलिसांनी हत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी तपास अधिक वेगाने सुरू केला.

पोलिस तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, प्रियंका यांच्या चारित्र्यावर संशय घेत त्यांचे पती आकाश ऊर्फ घाऱ्या रमेश कांबळे याने खुनाचा कट रचल्याचा आरोप आहे. या कटात प्रथम कांबळे, रोहित शिंदे आणि दिनेश वाघमारे या अन्य तिघांनी त्याला मदत केल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे. या चौघांनी मिळून प्रियंका यांची हत्या केल्याचा संशय असून, या प्रकरणातील प्रत्येक आरोपीची भूमिका तपासली जात आहे.

दरम्यान, गुन्हा केल्यानंतर चारही आरोपी फरार झाले होते. त्यामुळे पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी तातडीने पथके सक्रिय केली. गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या मदतीने पोलिसांनी आरोपींचा माग काढत अवघ्या २४ तासांच्या आत चारही आरोपींना अटक केली. पोलिसांच्या या जलद कारवाईमुळे हत्येच्या प्रकरणाचा तपास पुढे नेण्यास महत्त्वाची मदत झाली.

अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांना १६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या कालावधीत आरोपींकडून अधिक माहिती मिळविणे, हत्येमागील नेमके कारण स्पष्ट करणे, तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या शस्त्रासह इतर महत्त्वाचे पुरावे शोधण्याच्या दृष्टीने तपास सुरू आहे.

### अवघ्या २४ तासांत चारही आरोपी पोलिसांच्या ताब्यात

मोशीतील बोऱ्हाडेवाडी येथील मंत्रा मोमेंट्स सोसायटीच्या कमर्शियल ऑफिससमोर प्रियंका आकाश कांबळे यांचा मृतदेह आढळल्यानंतर एमआयडीसी भोसरी पोलिसांनी वेगाने तपास सुरू केला. चेहरा विद्रूप करण्यात आल्याने मृत महिलेची ओळख पटविणे सुरुवातीला कठीण झाले होते. मात्र, गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने पोलिसांनी मृत महिलेची ओळख निश्चित केली. या प्रकरणात पती आकाश ऊर्फ घाऱ्या रमेश कांबळे याच्यासह प्रथम कांबळे, रोहित शिंदे आणि दिनेश वाघमारे यांच्यावर हत्येचा कट रचून खून केल्याचा आरोप आहे.

# पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी भाजपचे सुशिक्षित उमेदवार

## संस्थाचालकांशी संवाद; पुण्याच्या विकासासाठी ५० हजार कोटींची गुंतवणूक

**» पुणे | प्रतिनिधी**

**पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने सुशिक्षित, अनुभवी आणि सक्षम उमेदवार दिले आहेत. तरुणांचे तसेच शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने या उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. पुण्यातील विविध क्षेत्रांतील संस्थाचालक आणि पदाधिकारी या उमेदवारांच्या पाठीशी उभे राहून त्यांना निवडून देतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केला. पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव आणि शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचाराच्या पार्श्वभूमीवर पुण्यात आयोजित बैठकीत ते बोलत होते.**



पुण्यातील हॉटेल मॅरिएट येथे शिक्षण, बँकिंग, सहकार आणि इतर क्षेत्रांतील संस्थाचालक व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना फडणवीस यांनी उमेदवारांच्या निवडीमागील भूमिका स्पष्ट केली. या वेळी निवडणुकीचे प्रचारप्रमुख तथा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव, शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, माजी कुलगुरू नितीन कळमारकर, राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असून, समाजातील विविध घटकांचे प्रतिनिधित्व आणि कायदे करताना वेगवेगळे दृष्टिकोन मांडण्याची संधी या सभागृहातून मिळणे अपेक्षित आहे. मात्र, अलीकडच्या काळात विधानपरिषदेच्या कामकाजात अपेक्षित दर्जा दिसून येत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे उमेदवारांची निवड करताना त्यांचे शिक्षण, अनुभव, कार्यक्षमता आणि दूरदृष्टी या बाबींना भाजपने प्राधान्य दिले आहे. पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांना उच्च शिक्षण आणि व्यवस्थापन क्षेत्रातील अनुभव आहे. तसेच, शिक्षण क्षेत्राकडे पाहण्याची त्यांची स्वतंत्र दृष्टी आहे. शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांनीही कमी वयात शिक्षण क्षेत्रात योगदान दिले आहे. या दोन्ही उमेदवारांच्या माध्यमातून विधानपरिषदेतील कामकाज अधिक प्रभावी होईल, अशी अपेक्षा फडणवीस यांनी व्यक्त केली.

राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारकडे पूर्ण बहुमत आहे. विधानपरिषदेतही भाजपला स्वतःच्या बळावर बहुमत मिळाले असल्याने या निवडणुकीतील जागा बहुमतासाठी आवश्यक आहेत, असा दावा पक्ष करणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, वरिष्ठ सभागृहात चांगले लोकप्रतिनिधी निवडून जावेत आणि त्यांच्या माध्यमातून समाजातील विविध प्रश्नांना योग्य व्यासपीठ मिळावे, हा पक्षाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

पदवीधर आणि शिक्षक मतदारांनी भाजपच्या उमेदवारांना पसंती दिल्यास राज्यात आणि देशात सुरू असलेल्या विकासकामांना सुजाण मतदारांची मान्यता मिळाल्याचा संदेश जाईल, असे फडणवीस म्हणाले. सरकारच्या कामाबाबत सुशिक्षित मतदारांमध्ये कितपत समाधान आहे, याचाही अंदाज या निवडणुकीतून येणार आहे. त्यामुळे ही निवडणूक केवळ उमेदवार निवडण्यापुरती मर्यादित नसून, सरकारच्या कामाविषयी मतदारांचा प्रतिसाद जाणून घेण्याची संधी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

पदवीधर मतदारसंघाच्या उमेदवार डॉ. स्मिता जाधव यांनी भाजपने ऐनवेळी उमेदवारी देऊन विश्वास दाखविल्याबद्दल अभिमान व्यक्त केला. नवरात्रोत्सवाच्या काळात पक्षाने आपल्यावर जबाबदारी सोपविली असून, पदवीधर आणि शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण बदल तालुकास्तरापासून सुरू करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### मोदी सरकारच्या विकासकामांचा लेखाजोखा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात विविध क्षेत्रांत परिवर्तन झाल्याचा दावा फडणवीस यांनी या वेळी केला. भारताचा आर्थिक विकास, पायाभूत सुविधांची उभारणी, डिजिटल व्यवहार, नवोन्मेष, स्टार्टअप परिसंस्था आणि यूपीआय प्रणाली यांचा उल्लेख करत त्यांनी केंद्र सरकारच्या कामाचा आढावा मांडला. देशाचा सात टक्क्यांहून अधिक विकासदर आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती भूमिका याकडेही त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. पुणे हे जागतिक क्षमता केंद्रांच्या (जीसीसी) क्षेत्रात महत्वाचे स्थान मिळवत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# उरुळी कांचनमध्ये पोलिस हवालदाराला धक्काबुक्की; तिघांवर गुन्हा

**» पुणे | प्रतिनिधी**

**रात्रीच्या गस्तीवर असलेल्या पोलिस हवालदाराला धक्काबुक्की करून त्यांच्या वर्दीचे बटन तोडल्याची घटना उरुळी कांचन येथे घडली. तसेच पोलिसांच्या सरकारी स्कार्पिओ गाडीच्या डाव्या बाजूच्या आरशाची तोडफोड करण्यात आली. याप्रकरणी तिघांविरुद्ध उरुळी कांचन पोलिस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



रात्रीच्या वेळी गस्त घालत असलेल्या पोलिस हवालदाराला संशयास्पद हालचाली करणाऱ्या तीन तरुणांकडे चौकशी करणे महागात पडल्याचा प्रकार उरुळी कांचन परिसरात घडला आहे. चौकशीदरम्यान एका तरुणाने पोलिस हवालदाराशी अरेरावीची भाषा वापरून त्यांना धक्काबुक्की केल्याचा आरोप आहे. तसेच, संबंधित तरुणांनी पोलिसांच्या सरकारी वाहनाच्या डाव्या बाजूच्या आरशाची काच फोडून नुकसान केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात तीन तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

शुभम रवींद्र लोणारी (वय २८, रा. महात्मा गांधी शाळेसमोर, उरुळी कांचन), ओंकार राजू वाकचौरे (रा. उरुळी कांचन) आणि धीरज लक्ष्मण नागटिळे (रा. दातार कॉलनी, उरुळी कांचन) अशी गुन्हा दाखल झालेल्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी पोलिस हवालदार संतोष गणपत जाधव (वय ४५) यांनी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस हवालदार संतोष जाधव हे रात्रीच्या वेळी आपल्या नियमित गस्तीवर होते. परिसरात गस्त घालत असताना उरुळी कांचन येथील महात्मा गांधी शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर, तुपेवस्तीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला अंधारात तीन तरुण उभे असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या या तरुणांच्या हालचाली त्यांना संशयास्पद वाटल्या. त्यामुळे जाधव यांनी संबंधित तरुणांकडे जाऊन त्यांची चौकशी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार, हवालदार जाधव यांनी आपले सरकारी स्कार्पिओ वाहन संबंधित तरुण उभे असलेल्या ठिकाणी नेले. त्यानंतर त्यांनी तिन्ही तरुणांकडे विचारपूस सुरू केली. मात्र, या चौकशीदरम्यान संबंधित तरुणांपैकी धीरज लक्ष्मण नागटिळे याने हवालदार जाधव यांच्याशी अरेरावीच्या भाषेत बोलण्यास सुरुवात केली. एवढेच नव्हे, तर त्याने जाधव यांना धक्काबुक्की केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

### रात्रगस्तीवरील पोलिसांशीच हुज्जत!

संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या तरुणांची विचारपूस करणे पोलिस हवालदाराला भोवले. धक्काबुक्की करून वर्दीचे बटन तोडण्यासह सरकारी वाहनाच्या आरशाची तोडफोड करण्यात आली. या प्रकारामुळे उरुळी कांचनमध्ये पोलिसांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# सिंहगडाच्या पायथ्याशी बिबट्याचा हल्ला!

## १७ वर्षीय मुलगी जखमी; वन विभागाकडून बिबट्याचा शोध सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

**सिंहगड किल्ल्याच्या पायथ्याशी खानापूरजवळील बापुजीबुवा खिंडीत मंगळवारी (दि. १३) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास बिबट्याने दुचाकीवरून जाणाऱ्या शेतकऱ्यासह दोन मुलींवर हल्ला केला. या हल्ल्यात १७ वर्षीय सलोनी थोपटे हिच्या पायाला ओरखडे पडले. सुदैवाने या घटनेत तिघेही बचावले. जखमी सलोनीवर ससून रुग्णालयात उपचार करून तिला घरी सोडण्यात आले. या घटनेनंतर वन विभागाने बिबट्याला पकडण्यासाठी मोहीम सुरू केली आहे.**



### बापुजीबुवा खिंडीत बिबट्याची दहशत

सिंहगडाच्या पायथ्याशी बापुजीबुवा खिंडीत बिबट्याने दुचाकीवरून जाणाऱ्या तिघांवर हल्ला केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेत १७ वर्षीय मुलगी जखमी झाली. वन विभागाने बिबट्याला पकडण्यासाठी शोधमोहीम सुरू केली असून, जंगलातून प्रवास करणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

थोपटेवाडी येथील कोंडिबा थोपटे (वय ४८), त्यांची मुलगी सलोनी थोपटे (वय १७) आणि तिची मैत्रीण मोना वैजनाथ राठोड (वय १८) हे तिघे मंगळवारी सायंकाळी बाजारहाट करण्यासाठी दुचाकीवरून खानापूरच्या दिशेने निघाले होते. सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या खानापूर-रांजणे-पाबे रस्त्यावरील बापुजीबुवा मंदिराजवळील वळणावरून जात असताना अचानक बिबट्या त्यांच्या दुचाकीसमोर आला. घनदाट जंगल आणि सायंकाळची वेळ असल्याने परिसरात अंधार होता. दुचाकीच्या हेडलाइटचा प्रकाश थेट बिबट्यावर पडल्याने तो बिथरला. त्यानंतर क्षणार्धात त्याने दुचाकीच्या मागे बसलेल्या सलोनीच्या पायावर पंजा मारला. बिबट्याच्या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे दुचाकीवरील तिघेही घाबरले. सलोनीच्या पायाला ओरखडे पडल्याने ती जखमी झाली आणि तिने आरडाओरडा केला. या अनपेक्षित प्रकारामुळे काही क्षण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

मात्र, अशा धोकादायक प्रसंगातही कोंडिबा थोपटे यांनी प्रसंगावधान राखले. त्यांनी दुचाकी न थांबवता दोन्ही मुलींना सुरक्षितपणे खानापूर येथे नेले. तेथे सलोनीला प्राथमिक उपचार देण्यात आले. मात्र, तिच्या पायाला बिबट्याच्या पंजामुळे जखमा झाल्याने पुढील उपचारांसाठी तिला रात्री ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रुग्णालयात तिच्यावर आवश्यक उपचार करण्यात आले. उपचारानंतर तिची प्रकृती स्थिर असल्याने रात्री उशिरा तिला घरी सोडण्यात आले. या घटनेत कोंडिबा थोपटे आणि मोना राठोड यांना गंभीर दुखापत झाली नसली, तरी बिबट्याच्या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे तिघांनाही मोठा मानसिक धक्का बसला.

घटनेची माहिती मिळताच वन परिमंडळ अधिकारी वैशाली हाडवळे, वनरक्षक बाळासाहेब जिवडे यांच्यासह वन विभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. वन अधिकाऱ्यांनी जखमी सलोनीची विचारपूस करून घटनेची माहिती घेतली. त्यानंतर बापुजीबुवा खिंड आणि आसपासच्या परिसरात बिबट्याचा माग काढण्याचे काम सुरू करण्यात आले. बिबट्याच्या हालचालींचा शोध घेऊन त्याला पकडण्यासाठी वन विभागाकडून आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. बिबट्या पुन्हा नागरी वस्त्यांच्या दिशेने येऊ नये, यासाठीही परिसरात लक्ष ठेवण्यात येत आहे.

खानापूर-रांजणे-पाबे हा रस्ता सिंहगड, राजगड आणि तोरणागड परिसराला जोडणाऱ्या मार्गांपैकी एक असून, या रस्त्याच्या काही भागांत घनदाट जंगल आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना वन्यप्राण्यांचा सामना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः सायंकाळी आणि रात्रीच्या वेळी या परिसरातून दुचाकीवरून प्रवास करताना नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. बिबट्या दिसल्यास त्याच्या जवळ जाणे, त्याला डिवचणे किंवा त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करू नये. तसेच अशा घटनांची माहिती तातडीने वन विभागाला द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. सिंहगडाच्या पायथ्याशी घडलेल्या या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून, बिबट्याला लवकरात लवकर पकडण्याची मागणी होत आहे.

# आळंदीत इंद्रायणी नदीत पुन्हा माशांचा खच; प्रदूषणाचा विळखा कायम!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**तीर्थक्षेत्र आळंदी येथील पवित्र इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात मासे मृतावस्थेत आढळून आल्याने जलप्रदूषणाचे गांभीर्य समोर आले आहे. सिद्धबेट बंधारा, गरुडस्तंभ आणि भक्त पुंडलिक मंदिर घाट परिसरात मृत माशांचा खच दिसून आल्याने भाविक, वारकरी आणि स्थानिक नागरिकांमधून चिंता व्यक्त केली जात आहे. वारंवार अशा घटना घडत असूनही नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**



### इंद्रायणीच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर

आळंदीतील इंद्रायणी नदीत वारंवार मृत मासे आढळून येत असल्याने नदीच्या आरोग्याबाबत चिंता वाढली आहे. धार्मिक महत्त्व असलेल्या या नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी तात्पुरत्या उपायांऐवजी प्रदूषणाच्या मूळ स्रोतांवर कारवाई करणे आवश्यक आहे. पाण्याची तपासणी, सांडपाणी नियंत्रण आणि नियमित देखरेख यांद्वारेच इंद्रायणी नदीचे संवर्धन शक्य होणार आहे.

बुधवारी (दि. १४) आळंदीतील इंद्रायणी नदीच्या विविध भागांत मोठ्या प्रमाणात मासे मृतावस्थेत आढळून आले. नदीच्या पाण्यावर तरंगणारे मृत मासे आणि परिसरात पसरणारी दुर्गंधी यामुळे नदीच्या प्रदूषणाची समस्या पुन्हा चर्चेत आली आहे. आळंदी हे राज्यातील प्रमुख तीर्थक्षेत्र असून, दररोज हजारो भाविक आणि वारकरी येथे दर्शनासाठी येतात. धार्मिकदृष्ट्या महत्त्व असलेल्या इंद्रायणी नदीची अशी अवस्था होत असल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, इंद्रायणी नदीत यापूर्वीही सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला माशांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या होत्या. वारंवार अशा घटना समोर येत असतानाही प्रदूषणाच्या मूळ कारणांचा शोध घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित होत आहे. नदीपात्रात मृत मासे आढळल्यानंतर ते हटविण्यापुरतीच कारवाई न करता, प्रदूषणाचे स्रोत कायमचे बंद करण्यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

> “इंद्रायणी नदीतील अस्सल माशांच्या स्थानिक प्रजाती नामशेष झाल्या असून, प्रदूषित रासायनिक पाण्यामुळे संक्रमित अशा विषारी माशांची निर्मिती नदीत होत आहे. जी येणाऱ्या काळात घातक ठरणार आहे. यामुळे कर्करोगासह पाण्यातील इतर जलचरांचे जीवन देखील धोक्यात येणार आहे. यावर लवकरच सविस्तर माहिती प्रसिद्ध करणार आहोत.”
> – निसार सय्यद, **अविरत फाउंडेशन, आळंदी**

इंद्रायणी नदीत मिसळणारे मैलामिश्रित सांडपाणी तसेच औद्योगिक क्षेत्रातून येणारे रसायनयुक्त पाणी हे प्रदूषणाचे संभाव्य स्रोत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सांडपाण्यामुळे नदीतील पाण्याची गुणवत्ता खालावण्याबरोबरच जलचरांच्या अस्तित्वावरही परिणाम होऊ शकतो. पाण्यातील विरघळलेल्या ऑक्सिजनची पातळी कमी झाल्यास माशांचा मृत्यू होण्याची शक्यता असते. मात्र, आळंदीतील सध्याच्या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पाण्याचे नमुने तपासल्यानंतरच त्याबाबत निश्चित निष्कर्ष काढता येणार आहे.